# ‘आयसर’मध्ये जानेवारीत विज्ञानविषयक स्पर्धा

**पुणे, ता. ४ :** एक्सायटिंग सायन्स ग्रुपतर्फे शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानविषयक आणि नव्या शोधांविषयी कुतूहल वाढविणाऱ्या ‘सायन्स क्विझ-कुतूहल २०१६’ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ९ जानेवारीला पाषाण येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च (आयसर) संस्थेत होणार आहे.

इयत्ता आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक आणि अंतिम अशा दोन फेऱ्यांमध्ये ही स्पर्धा होईल, असे एक्सायटिंग सायन्स ग्रुपतर्फे सांगण्यात आले. स्पर्धा नि:शुल्क असून, २४ डिसेंबरपर्यंत नावनोंदणी करता येईल. संस्थेतर्फे पाषाण येथील वेंचर सेंटर, एनसीएल इनोव्हेशन पार्क येथे प्रत्येक महिन्यातील एका रविवारी सकाळी १० ते ११:३० या वेळेत विज्ञानविषयक व्याख्यान आयोजित केले जाते. त्यामध्ये ‘एनसीएल’ आणि ‘आयसर’मधील शास्त्रज्ञ मार्गदर्शन करतात. या वेळी १३ डिसेंबर रोजी ‘प्रेझेंट फिजिक्स-फ्युचर डीवाइस’ या विषयावर आणि १९ डिसेंबर रोजी ‘हाऊ ड्रोन्स वर्क? द सायन्स ऑफ ऑटोमेशन’ या विषयावर व्याख्यान होणार आहे.